आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२२ जुलै २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नीट पेपरफुटीच्या मागणीवरुन संसदेत आजही गदारोळ, कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- आंदोलक विद्यार्थ्यांवर कायदेशीर कारवाई न करण्याचं आश्वासन सरकारनं दिलं तर उपोषण मागं घेण्याची सोनम वांगचुक यांची तयारी

- संसदेवर निघालेल्या मोर्चावर पोलिसांनी बळाचा गैरवापर केल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाची केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांना नोटिस

- आमदार-खासदारांच्या पक्षांतरासंदर्भात घटनेतल्या तरतुदीवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी, ६ खासदारांच्या पक्षफुटीवरुन लोकसभा सभापतींना नोटीस

**आणि**

- INS मालवण भारतीय नौदलात समाविष्ट, समुद्र प्रदक्षिणा पूर्ण करत तिन्ही सैन्य दलातल्या महिला अधिकारी मुंबईत दाखल

**<><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणासह विविध मुद्द्यांवरून विरोधी पक्षांनी केलेल्या विरोधानंतर आज संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेत आज सकाळी कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा नीट पेपरफुटीप्रकरणी चर्चा करावी आणि शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी काँग्रेसच्या के. सी. वेणुगोपाल यांनी लोकसभेत केली. संसदीय कार्य मंत्री किरेन रीजिजू यांनी सरकार चर्चेला तयार आहे. केव्हा, किती वेळ आणि कोणत्या नियमानुसार चर्चा करायची हे ठरवूया असं आवाहन सदस्यांना केलं.

**- - (होल्ड - किरेन रिजीजू ३५ सेकंद) - - -**

महिला खासदारांशी अयोग्य वर्तन केल्याच्या मुद्द्यावरुन संसदीय कार्यराज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी अधिवेशन कालावधीसाठी तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. सभागृहानं तो बहुमतानं मंजूर केला. त्यानंतर सदस्यांचा गोंधळ सुरू राहिल्यानं लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी नीट पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित केला. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी या मुद्द्यावर चर्चेची सरकारची तयारी असल्याचा पुनरुच्चार केला. मात्र शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय निष्पक्ष चर्चा शक्य नसल्याचं सांगत चर्चेआधी शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी खर्गे यांनी केली.

**- - होल्ड - खर्गे - - -**

आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेली कारवाई, नीट पेपरफुटीचा मुद्दा आणि इतर मुद्द्यांवर काँग्रेस खासदार रेणुका चौधरी आणि सय्यद नासीर हुसेन यांनी स्थगन प्रस्ताव दिला. आपचे खासदार संजय सिंग यांनीही या मुद्द्यावरुन स्थगन प्रस्ताव दिला. मात्र कामकाजात नमूद केलेल्या मुद्द्यांवरच चर्चेसाठी या नियमाचा वापर करता येतो असं उपाध्यक्ष हरिवंश म्हणाले. गदारोळ कायम राहिल्यानं राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई करणार नाही, असं ठोस आश्वासन सरकारनं दिलं तरच उपोषण मागे घेऊ असं सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आज सांगितलं.

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांना वांगचुक यांनी पत्र पाठवले. या दोन्ही नेत्यांनी काल रात्री रुग्णालयात येऊन भेट घेतल्याबद्दल त्यांचे आभार या पत्रातून मानण्यात आले आहेत.तसंच आंदोलनकर्त्यांवरील कारवाईबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही वांगचुक यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

संसदेवर काल कॉक्रोच जनता पार्टीच्या बॅनरखाली निघालेल्या मोर्चातील आंदोलकांवर पोलिसांनी बळाचा गैरवापर केल्याप्रकरणी दाखल झालेल्या याचिकेवर, दिल्ली उच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांना नोटिस बजावली आहे. चार आठवड्यांत या नोटिसीला उत्तर द्यायला सांगितलं आहे. मुख्य न्यायाधीश डी.के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या पीठानं या प्रकरणाशी संबंधित असलेलं सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचं फुटेज तसंच पोलिसांनी केलेल्या व्हिडिओ चित्रीकरणाचा समावेश असलेल्या सर्व नोंदी एकत्रित करण्याचे निर्देश दिले आहेत.

या प्रकरणाची पुढची सुनावणी ११ सप्टेंबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

घटनेतल्या दहाव्या अनुसूचीचा अर्थ लावण्याचा पुनर्विचार करण्यासंदर्भातल्या याचिकेवर सुनावणी घ्यायची तयारी सर्वोच्च न्यायालयानं दाखवली आहे. या अंतर्गत पक्षांतरानंतर अपात्रता टाळण्यासाठी आमदार आणि खासदार इतर राजकीय पक्षात विलिन झाल्याचं कारण देतात. काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांनी ही याचिका दाखल केली आहे. याप्रकरणी सोमवारी सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ६ खासदारांच्या शिवसेना प्रवेशाला मान्यता देण्याच्या लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी घ्यायची तयारी सर्वोच्च न्यायालयानं दाखवली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठानं याप्रकरणी लोकसभेचे सभापती तसंच ६ खासदारांना नोटीस बजावली आहे. याप्रकरणी पुढची सुनावणी २ आठवड्यांनी होणार आहे.

**<><><><><>**

आय ए एस व्ही त्रिवेणी या नौकेवरच्या तिन्ही सैन्य दलांच्या महिलांची समुद्र प्रदक्षिणा ही असामान्य कामगिरी असल्याचे गौरवोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले. समुद्र प्रदक्षिणा करून परतलेल्या त्रिवेणी या युद्धनौकेचं त्यांनी आज मुंबईत दूरस्थ पद्धतीनं स्वागत केलं, त्यावेळी ते बोलत होते.

लेफ्टनंट कर्नल अनुजा वरूडकर यांच्या नेतृत्वाखाली तिन्ही दलांच्या महिला अधिकाऱ्यांची ही मोहिम ११ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईतून सुरु झाली. सुमारे २५ हजारांहून अधिक सागरी मैलांचा प्रवास, विषुववृत्त दोनदा ओलांडणं, तीन प्रमुख 'केप्स'ना वळसा घालणं, तसंच दक्षिण महासागराच्या पट्ट्यासह सर्व रेखांश आणि प्रमुख अक्षांशांवरून प्रवास करणं अशा टप्प्यांतून या मोहिमेने आपली जागतिक प्रदक्षिणा यशस्वीरीत्या पूर्ण केली. या मोहिमेच्या यशाबद्दल लेफ्टनंट कर्नल अनुजा वरूडकर यांनी आपला आनंद व्यक्त केला..

**- - होल्ड.. बाईट - अनुजा वरुडकर - -**

**<><><><><>**

कर्नाटकात कारवार इथं भारतीय नौदलानं आयएनएस मालवण या पाणबुडीरोधी युद्धनौकेचा सेवेत समावेश केला. या समारंभाला हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कोचीन शिपयार्डनं बनवलेल्या या युद्धनौकेत ८० टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी उपकरणं आणि तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.

<><><><><>

शिक्षण क्षेत्रात सुधारणांना वाव असणं ही देशातली एक गंभीर समस्या बनल्याची टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. गेल्या दशकात सुमारे १५२ पेपर फुटले असून त्यामुळे साडे सात कोटी विद्यार्थी प्रभावित झाले आहेत. पण या दशकात कुणालाही शिक्षा झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता सरकारकडे तीन मागण्या केल्या आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा द्यावा, ज्यांनी विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केली, त्यांच्यावर कारवाई करावी आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशा तीन मागण्या विद्यार्थ्यांनी केल्याचं राहुल गांधी म्हणाले…

**- - होल्ड.. बाईट - राहुल गांधी - - -**

<><><><><>

आंदोलन करणाऱ्याशी चर्चा करणं सरकारचं काम असतं, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलत होते. जंतर मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी सरकारचं वर्तन अत्यंत वाईट असून हे लोकशाहीप्रधान देशाचं चित्र नसल्याची टीका त्यांनी केली. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले..

**- - होल्ड.. बाईट - उद्धव ठाकरे- - -**

//<><><><><>//